अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १२ मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १६२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## आंदोलक अन् 'खाकी'वर्दीमध्ये झटापट; महापालिकेसमोर तणावाचे वातावरण

**सोलापूर** : शहरातील पथविक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या मोर्चाला बुधवारी हिंसक वळण लागले. सीटू संलग्न हॉकर्स युनियनने सोलापूर महापालिकेवर धडक दिली असता, आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार धक्काबुक्की झाली. पोलिसांनी आंदोलकांना अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र संतापलेल्या फेरीवाल्यांनी बंदोबस्त तोडून मुख्य प्रवेशद्वारापर्यंत मजल मारल्याने महापालिका परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या रणकंदनामुळे प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शहरातील फळ-भाजी विक्रेते, चारचाकी फेरीवाले, खोकेधारक तसेच पथविक्रेत्यांच्या विविध मागण्यांसाठी महानगरपालिकेवर मोर्चा काढण्यात आला होता.बुधवारी लाल बावटा कार्यालयापासून मोर्चाची सुरुवात करण्यात आली. फेरीवाले आणि सीटूचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चा पुढे जात महानगरपालिकेसमोर पोहोचताच पोलिसांनी आंदोलकांना अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी फेरीवाले, सीटूचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये काही काळ झटापट झाली.

# किचन क्लोज, शटर्स डाऊन, द्राक्षे, टॉवेलचे झाले गोडाऊन!

## प्रशासनाचा दिलासा पण महागाईचा जबर चटका




**सोलापूर/प्रतिनिधी**

**अवघ्या आठवड्यात युद्धाची धग सोलापूर जिल्ह्यात पोचली आहे. गॅस सिलेंडर पुरवठा थांबल्याने भांबवलेले हॉटेलसह अन्य व्यावसायिक, स्वयंपाकघरातील सिलिंडर मिळणे तर दूरच पण तो नोंदविण्यासाठीचा सुरु झालेला नागरिकांचा संघर्ष, सिलेंडर मिळवण्यासाठी तळपत्या उन्हात लागलेल्या रांगामध्ये थांबण्याची बेजारी, सीएनएजी गॅस मिळणं तर दुरापास्त झालेलं, यंत्रमाग उत्पादित मालांनी हाऊसफुल्ल होत असलेली गोडाऊन्स, निर्यातीच्या मार्गावर अडकून राहिलेले द्राक्षांचे ३०० आणि केळीची ३५ हजार कंटनेर, निर्यातीअभावी लाखो मेट्रिक टन गोडावूनमध्ये पडून राहात असलेली साखर, जिल्ह्यातील ३०० उद्योगांची धडधड थांबण्याची स्थिती, सुमारे २० ते २५ हजार कामगारांवर घरी बसण्याची आलेली वेळ, एवढचं काय तर गॅस दाहिन्यांमध्ये मृतांवर अंत्यसंस्कार होतील की नाही, याची नसलेली शाश्वती असं सगळं चित्र आखाती देशांमधील युद्धांमुळे सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रात निर्माण झाले आहे.**

दरम्यान, गोंधळाची स्थिती, अफवांचा बाजार, प्रशासनाकडून गॅससंदर्भात केले जात असलेले दावे आणि वास्तव परिस्थिती आणि एकूण निर्माण होत असलेली कोंडीच...कोंडी...हवालदिल नागरिक...समाज मनात निर्माण होत असलेली घबराट अशी वास्तव स्थिती या जिल्ह्यात निर्माण झाली असून मुख्यत्वे, इंधन आणि नैसर्गिक वायुच्या तुटवडा आणि एकूणच दैनंदिन जीवन जगत असतानाची सर्व आघाड्यांवरची नाकेबंदी यातून सोलापूर जिल्ह्याची वाटचाल आणीबाणीच्या दिशेने येत्या काही दिवसांत होणार की काय? अशी शक्यता वर्तवण्यात येऊ लागली आहे.

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा थेट फटका आता सिलिंडरच्या

(अधिक वृत्त पान ५ वर...)

### यंत्रमाग उत्पादनाच्या १५ टक्के निर्यातीला 'खो'

**गोडावून्स हाऊसफुल्ल, उद्योजक आर्थिक अडचणीत**

यंत्रमागाद्वारे तयार होणाऱ्या चादर, टेरीटॉवेलची सोलापुरातून साधारण १५ टक्के निर्यात आखाती देशांमध्ये होते. दुबई हे निर्यातीचे केंद्र आहे. तेथून यंत्रमागाची उत्पादने कतार, सौदेअरेबिया, इराण, बगदाद, गल्फ आदी देशांमध्ये जातात. मात्र निर्यात साखळी पूर्णपणे तुटली आहे.



संबंधित देशांमधील व्यापाऱ्यांनी माल निर्यात न करण्याबद्दल सुचना दिल्या आहेत. निर्यातीमधील अडचणींमुळे करोडोंचा फटका सोलापूरच्या यंत्रमाग उद्योगांना बसू शकतो. त्याशिवाय पॅकिंगच्या साहित्यात ५ ते ६ टक्के वाढ झाली आहे. रसायने, रंग यांच्या किंमतीतदेखील १० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. एकीकडे गुंतवणूक केलेल्या मालाची निर्यात बंद आहे. त्यामुळे माल गोडावूनमध्ये पडून राहात आहे. शिवाय उत्पादन बंद ठेवून चालत नाही. त्यासाठीचा कच्चा माल चढ्या दराने खरेदी करावा लागत आहे. त्याशिवाय एक्सपोर्ट होत नसल्यानं मालासाठी दुसरी बाजार पेठ शोधावी लागत आहे. यंत्रमाग उद्योग बंद झाल्यास व्यापाऱ्यांची काही खैर नाही. त्याशिवाय हजारो कामगारांवर उपासमारीची वेळ येणार आहे. यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेटप्पा गड्डम यांनी ही माहिती दिली.



सोलापूर : डोणगाव रोड परिसरात गॅस सिलिंडर घेण्यासाठी जमलेली नागरिकांची गदी.

### द्राक्ष काढणीवेळी मोठा दणका, नुकसान सहन करण्याची वेळ

सोलापूर जिल्ह्यात साधारण ४० हजार हेक्टर क्षेत्रावर द्राक्ष पीक आहे.



उत्पादित मालापैकी १० टक्के मालाची निर्यात होते. दरम्यान निर्यातीसाठी द्राक्ष काढण्याच्या नेमक्या मोक्याच्यावेळी माल पाठवू नका, असे निरोप आखाती देशांमधील व्यापाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे प्रतिकिलो साधारण १२५ रुपयांपर्यंत मिळणार दर आता स्थानिक बाजारपेठेत ८० रुपये मिळणार आहे. तसेच यापूर्वी निर्यातीसाठी पाठवलेले २५०-३०० कंटेनर मध्यल्यामध्येच अडकले आहेत. त्यामुळं आखाती देशांमधील युद्धाचा फटका द्राक्ष शेतीला बसल्याचे महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे खजिनदार शिवाजी पवार यांनी सांगितलं.

### खाणावळींवरही परिणाम

गॅसपुरवठा कमी होत असल्याने आम्ही वापर मर्यादित करत आहोत. भाकरी देणे बंद करून चपाती देण्यास सुरुवात केली आहे. गॅस उपलब्ध नसेल, तर खाणावळी बंद कराव्या लागतील. त्यामुळे आमचे नुकसान होईलच; पण विद्यार्थी, नोकरदार आणि कामगारांचेही हाल होतील, असे खानावळचालकांनी सांगितलं.


### प्रशासन म्हणतंय, तुटवडा नाही मगं नेमकं पाणी मुरतंय कुठं?

वास्तविक सोलापूर शहर तसेच जिल्ह्यातील निमशहरं आणि मोठ्या गावांमध्ये घरगुतीसह व्यावसायिक गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाला आहे. व्यावसायिक सिलेंडरची दररोजची साधारण ११ हजाराची नोंदणी बंद झाली आहे. शनिवापासून पुरवठा बंद झाला आहे. तर घरगुती सिलेंडचे बुकिंगदेखील बंद झाले आहे. नागरिकांना सिलेंडसाठी उन्हातान्हात रांगेत उभे राहावे लागत आहे. अशातही प्रशासन तुटवडा नसल्याची भूमिका ठासून मांडत आहे. प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी बुधवारी स्पष्ट केले की, तुटवडा नाही. इंधन वितरीत करणाऱ्या कंपनींच्या प्रतिनिधी चर्चा झाली आहे. तुटवडा भासणार नाही, याचे नियोजन जिल्हा प्रशासनाकडून केले जात आहे. दुसरीकडे जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनीदेखील मंगळवारपासून तीच भूमिका मांडली आहे. तुटवडा नसेल तर गॅस मिळणं बंद कसं झालं? सामान्य नागरिकांसह व्यावसायिकांची ससेहोलपट कशी सुरु झाली? याची उत्तरं प्रभारी जिल्हाधिकारी जंगम आणि पुरवठा अधिकारी सरडे यांच्याकडून मिळायला हवीत, अशी रास्त भूमिका नागरिकांची आहे.

## सुनेच्या छळाला कंटाळून बार्शीत सासऱ्याने आयुष्य संपवले

**सोलापूर/प्रतिनिधी**

बार्शी शहरात एक मोठी घटना उघडकीस आली आहे. सुनेच्या



सर्जेराव नायकुडे

त्रासाला कंटाळून सासऱ्याने आत्महत्या केली आहे. सून ही नेहमी सासऱ्याला धकमकावत होती, 'तुला घरातून हाकलून देईन', अशी धमकी ती नेहमी देत असायची. सततच्या अपमानाला कंटाळून वृद्ध सासऱ्याने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली आहे.

**नेमकं झालं तरी काय?**

सुनेच्या त्रासाला कंटाळून बार्शी येथे एका ७३ वर्षीय वृद्धाने आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त होत आहे. सुनेच्या जाचाला कंटाळून राहत्या घरात आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना काल मंगळवारी रोजी सकाळी उघडकीस आली आहे.

(अधिक वृत्त पान ५ वर...)

सोलापूर शहराचे **तापमान**
कमाल तापमान **३८.०**

## सांगोल्यात शेकापच्या ५५ वर्षाच्या गडाला सुरुंग

### दीपकआबांनी गेम फिरवला : पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकणार

**सोलापूर/प्रतिनिधी**

पंचायत समितीच्या सभापती निवडीपूर्वीच सांगोल्यात पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा करिष्मा पाहायला मिळत आहे. माजी आमदार दीपक साळुंखे पाटील यांच्या गटातील तीन पंचायत समिती सदस्यांनी बुधवारी मुंबई येथे भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे आता सांगोला पंचायत समितीवर भाजप आणि शिंदे सेनेची सत्ता येणार हे उघड झाले आहे. शेकापची ५५ वर्षाची सत्ता उद्या संपुष्टात येणार आहे.

(अधिक वृत्त पान ५ वर...)

### सभापतीपदी पुनम इंगोले?

पंचायत समितीमध्ये भाजपने एक आणि शहाजी बापूंच्या शिवसेनेने चार जागा जिंकल्या होत्या. आता दीपक साळुंखे गटातील तीन पंचायत समिती सदस्यांनी थेट भाजपमध्ये प्रवेश केल्याने सांगोला पंचायत समितीवर भाजप-शिवसेनेचे बहुमत झाले आहे. गुरूवारी होणाऱ्या निवडीमध्ये भाजपमध्ये प्रवेश केलेल्या पुनम इंगोले यांचे नाव सभापती पदासाठी तर उपसभापती पदासाठी शिंदे सेनेचे अजय सरगर यांचे नाव निश्चित झाल्याची माहिती आहे.



सांगोला : पक्षप्रवेशाप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी आमदार दीपकआबा साळुंखे-पाटील आदी.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपण आधीपासून चुलच वापरतोय !

कल्याण
445-30-370

मुंबई
499-23-670

2 8 4

## कोमातील तरूणाला इच्छामरण देताना न्यायमूर्तींना रडू कोसळले

### देशाच्या इतिहासातील पहिलाच निकाल

**नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाने देशाच्या इतिहासात बुधवारी एक ऐतिहासिक निर्णय दिला.दिल्लीच्या एम्स रूग्णालयात गेल्या १३ वर्षांपासून कोमात गेलेल्या ३२ वर्षीय हरीश राणा तरूणाला इच्छामरणाची परवानगी दिली.हा निकाल देताना न्यायमूर्ती जे.बी.पार्डीवाला यांना दुःखाश्रू अनावर झाले.न्यायमूर्तींची ही भावना पाहाता न्यायालयातील वातावरणही स्तब्ध झाले होते. भारतात अशाप्रकारच्या पॅसिव्ह युथनेशिया अर्थात निष्क्रिय इच्छामृत्यूचा हा पहिलाच निकाल ठरला.

राणा याच्या इच्छामरणावर न्यायालयात सुनावणी झाली. न्या. पार्डीवाला आणि न्या. के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने राणा याच्या पालकांना व्हेंटिलेटर व जीवन-आवश्यक कृत्रिम वैद्यकीय पद्धती काढण्याची परवानगी दिली. कारण हरीश राणा गेल्या १३ वर्षांपासून कोमात होता. हरीशच्या इच्छामरणाचा खटला देशभर चर्चेचा विषय बनला होता, ज्यामुळे सन्मानाने मरण्याचा अधिकार असे महत्वाचे प्रश्न उपस्थित झाले होते. बुधवारी निकाल वाचताना न्या. पार्डीवाला म्हणाले की, हरीश शिक्षणात हुशार विद्यार्थी होता, परंतु एका अपघाताने त्याचे आयुष्य कोलमडून गेले. या प्रकरणाची परिस्थिती सांगताना न्यायमूर्ती पार्डीवाला भावनिक झाले आणि त्यांचा आवाज काही काळासाठी भावूक झाला. खंडपीठाने आपल्या निकालात पुढे म्हटले आहे की, अशा प्रकरणांमध्ये रुग्णासाठी मृत्यू सोयीचा आहे की नाही, हा प्रश्न नसतो; तर जीवन देणारे उपचार रुग्णाच्या हिताचे आहेत का हा प्रश्न असतो. न्यायालयाने नमूद केले की, हरीश राणा केवळ झोप आणि जाग एवढ्याच चक्रात अडकला आहेत. तो इतर कुठल्या गोष्टींला अर्थपूर्ण प्रतिसाद देऊ शकत नाहीत. तो त्याच्या दैनंदिन कामांसाठी पूर्णपणे इतरांवर अवलंबून आहे. न्यायालयाने असेही नमूद केले की, हरीशला पीईजी ट्यूबद्वारे क्लिनिकली एडमिनिस्टर्ड न्यूट्रिशन मिळत आहे आणि गेल्या काही वर्षांत त्याची प्रकृती अजिबात सुधारलेली नाही.

### हरीश राणाला काय झाले होते?



२० ऑगस्ट २०१३ रोजी हरीश राणा चौथ्या मजल्यावरून पडला. यामुळे डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि एका दशकाहून अधिक काळ तो कोमात आहे. यानंतर, सर्वोच्च न्यायालयाने नवी दिल्लीतील एम्सच्या दुय्यम वैद्यकीय मंडळाने सादर केलेल्या राणाच्या वैद्यकीय अहवालाची तपासणी केली होती आणि अहवाल दुःखद असल्याचे म्हणत त्याच्या इच्छामरणाला परवानगी दिली.

## काळजावर दगड ठेवून आई - वडिलांनी मागितला मृत्यू

### ३२ वर्षांच्या हरीश राणाची सुन्न करणारी कहाणी

२०१३ मध्ये हरीश राणा चंदिगढ विद्यापीठात बी.टेक.च्या शेवटच्या वर्षाला होता. सिव्हिल इंजिनीअर होण्याचे स्वप्न पाहणारा हरीश रक्षाबंधनाच्या दिवशी होस्टेलच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडला. या भीषण अपघातात त्याच्या मेंदूला आणि मणक्याला गंभीर दुखापत झाली आणि तो १०० टक्के दिव्यांग झाला. तेव्हापासून तो केवळ मशीन आणि नळ्यांच्या आधारे श्वास घेत होता.

**कुटुंबाची आर्थिक आणि मानसिक होरपळ**

हरीशचे वडील अशोक राणा (६३) आणि



आई निर्मला देवी यांनी आपल्या मुलाला वाचवण्यासाठी सर्वस्व पणाला लावले होते. हरीशच्या उपचारावर दरमहा ४० ते ५० हजार रुपये खर्च होत होते. मुलाच्या उपचारासाठी त्यांनी दिल्लीतील आपले तीन मजली घरही विकले होते. वडिलांना केवळ ३,५०० रुपये पेन्शन मिळते,

(अधिक वृत्त पान ५ वर...)